सदैव तत्पर, सदैव मदतीस

Tel :- 022 22620453
E mail ID - dcpzone1-mum@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**पोलीस विभाग**

**Dy. Commissioner of Police, Zone 1, Mumbai**
Walchand Hirachand Marg, Fort, Mumbai-400001.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई.
वालचंद हिराचंद मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१

पुण्यश्लोक ३००

जा.क्र. २०७ /पोउआ/परि१/वा./२०२६ दिनांक - ३०/०१/२०२६

प्रति,

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई.

**विषय -** न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल....

**संदर्भ -** १) शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल१०, दि.२६/०२/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरून अहवाल सादर करण्यात येतो की, दि. ०१/१०/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५ या कालावधीमध्ये पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ कार्यालयामध्ये न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीकरिता परिमंडळ -१ मधील सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस निरिक्षक (गुन्हे), पैरवी अधिकारी व विधी अधिकारी, परिमंडळ -१ इत्यादी सदस्य उपस्थित होते. समितीच्या बैठकींमध्ये परिमंडळ-१ मधील दोषमुक्त झालेल्या ०५ खटल्यांच्या न्यायनिर्णयांची तपासणी करण्यात आली.

सदरचा अहवाल माहितीकरिता सादर करण्यात येत आहे.

(डॉ. प्रविण मुंढे) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, मुंबई

Rdr
०२/०२

Dy. Commissioner of Police (Detection)
Crime Branch C I D Mumbai

आ. क्र. ३११/ पोउआ (प्रकटीकरण)/२६
दिनांक ०१/०२/ २०२६

Scanned with CamScanner

आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१, मुंबई    समितीच्या बैठकीचा दिनांक :- दिनांक - २९/०१/२०२६

| प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सेशन केस क्र. ५११/१९८१<br>कोर्ट नं. १०<br>मा. न्यायाधीश<br>**ए.पी. कुलकर्णी** | **कुलाबा पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ७९५/१९९७,<br>कलम ३०७ भा.दं.वि | २०/१०/१९८१ | ०४/१२/२०२५ | १. सदरची घटना ही दिनांक २०/१०/१९९७ सालची असल्यामुळे साक्षीदार नं. १ पिडीत महिला तक्रारदार यांना सदरची घटना आठवत नाही असे सांगितले.<br>२. सदर केसमधील साक्षीदार नं.१ पिडीत महिला आरोपीला ओळखत नाही.<br>३. सदर घटनेची इतर साक्षीदार मिळून आले नाहीत.<br>४. सदर केस मधील आरोपीविरुध्द पुरावे आढळून आले नाहीत.<br>एकंदरीत पुराव्या आभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **नाही** | - | - |
| सेशन केस क्र.<br>८९८/२०१९<br>कोर्ट नं. ५४<br>मा. न्यायाधीश<br>**सत्यनारायण नवनदेर** | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. २४१/२००९,<br>कलम १४१, १४२,<br>१४३, १४६, १४७,<br>१४९, ३५३, ३४२, ४२७<br>भादवी सह कलम ५१<br>अमेंटमेंट ऑफ बीपी ॲट<br>सह कलम ३ व ७<br>प्रिव्हेनशन ऑफ डॅमेज<br>ऑफ पब्लीक प्रॉपर्टी ॲक्ट | २९/०६/२०१९ | १८/१२/२०२५ | १. सदर केसमध्ये साक्षीदार नं. १ बलराज रगशिवदे यांच्या उलट तपासणीमध्ये सांगितले की, कोणत्याही आरोपीने सरकारी सेवकांवर हल्ला करण्याचा किंवा दुखापत करण्याचा प्रयत्न केला नाही.<br>२. साक्षीदार यांचे अनेक मुद्दयांवर विरोधाभास आहे.<br>३. साक्षीदार फितुर झालेले आहेत<br>४. सदर केसमध्ये कोणताही विशिष्ट पुरावा आभियोक्ता पक्षाने मा. न्यायालयासमोर सादर केला नाही.<br>५. सदर केसमधील साक्षीदार नं. २ ने कबुल केलले की कोणत्याही आरोपीने सरकारी सेवकांवर हल्ला केला नाही.<br>६. साक्षीदाराने आरोपीतांना ओळखले नाही.<br>एकंदरीत साक्षीदार फितूर झाल्याने व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | नाही | **नाही.** | - |
| सेशन केस क्र.<br>३०५/२०१७<br>शल जज अंडर पोक्सो ॲक्ट<br>मा. न्यायाधीश<br>**सबिना ए. मलिक** | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १३९/२०१७,<br>कलम ३५४(अ), (सी),<br>(डी) भा.दं.वि सह कलम<br>८, १२ पोक्सो ॲक्ट सह<br>कलम ६७ आय टी ॲक्ट | ०१/०७/२०१७ | ०६/११/२०२५ | १. सदर घटटनेमध्ये पिडीत मुलीचा वयाचा पुरावा जन्म दाखला मुळ पुरावा मा. न्यायालयामध्ये उपलब्द झालेला नाही.<br>२. आरोपीने पिडीत मुलीचे व्हिडीओ चित्रण केले. सदर प्रत्यक्ष घटना पिडीत मुलीनी पाहिली नाही.<br>३. सदर घटनेच्या प्रत्येक साक्षीदाराच्या कथनात आरोपीने पिडीत मुलीचे केलेले व्हिडीओ चित्रण यामध्ये तफावत आहे.<br>४. उलट तपासणीत साक्षीदार नं. ३ ने कबुल केले की त्यांना घटना झाल्यानंतर बोलवण्यात आले होते. त्यांना प्रत्यक्ष घटनेची कोणतीही माहिती नाही.<br>५. पिडीत मुलीच्या साक्षीमध्ये आरोपीने केलेल्या व्हिडीओ चित्रणाच्या बाबतीत आभाव दिसून आला.<br>६. सदर घटनेमध्ये स्वतंत्र पुरावे सादर केलेले नाहीत.<br>७. सदर घटनेतील पंच साक्षीदार सक्षीदार नं. ५ ने कबुल केले की, त्याला मराठी लिहीता वाचता येत नाही. जबाबामध्ये पोलीसांनी काय लिहीले आहे. त्याला माहिती नाही.<br>८. सदर आरोपीने पिडीत मुलीच्या शरिराच्या कोणत्या भागाचे | **होय,**<br>पोनि सचिन जाधव<br>सेवानिवृत्त सपोआ सुभाष बोराडे | **मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर** | - |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार / त्यांची / त्यांच्या प्र / केलेली/ प्र न / केलेली व |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | व्हिडीओ चित्रण केले यामध्ये तफावत आहे.<br>९. पिडीत मुलीच्या साक्षीत विसंगती तफावत दिसून येते.<br>१०. सदर आरोपी पिडीत मुलीचे व्हिडीओद्वारे चित्रण करीत आहे हे पिडीत मुलीना दुसऱ्यांकडून कळले.<br>११. तज्ञांच्या अहवालात आरोपीच्या मोबाईल मध्ये क्लीप रेकॉर्ड झाल्या याची पृष्टी झालेली नाही.<br>१२. सदर घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले नाहीत.<br>१३. आरोपीने व्हिडीओ प्रसारित करण्याचा कोणताही पुरावा मिळालेला नाही.<br>१४. सदर केसमध्ये पोक्सो ॲक्ट लागण्यासाठी कोणताही मुळ कागदोपत्री पुरावा अथवा वैद्यकिय चाचणीद्वारे पुरावा अभियोक्ता पक्ष मा. न्यायालयामध्ये सादर करू शकले नाही.<br>एकंदरीत तपासी अधिकारी यांनी तपास योग्य न केल्यामुळे आरोपीस फायदा मिळून आरोपी दोषमुक्त झाला आहे. | | |
| ४ | सेशन केस क्र. ५७९/२०१५<br>कोर्ट नं. ४१<br>मा. न्यायाधीश<br>**आर.जे. पवार** | **डोंगरी पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १२३/२०१५, कलम ३७६, ३६६, १०९, ३४ भादवि | १७/०७/२०१५ | ३१/१२/२०२५ | १. सदर घटनेमध्ये पंच साक्षीदार हे सवयीचे साक्षीदार आहे.<br>२. सदर घटनेमध्ये पंच साक्षीदार फितूर झाले.<br>३. सदर घटनेमध्ये फिर्यादी मिळून आली नाही.<br>४. अभियोक्ता पक्षाने पिडीतेची तपासणी केली नाही. तिचा शोध घेतला तरी सापडली नाही.<br>५. साक्षीदान नं. १ चे पुरावे संशयास्पद आहेत<br>६. साक्षीदान नं. २ व साक्षीदार नं. ३ यांचे पुरावे आरोपीस दोषी करण्यासाठी पुरेसे नाहीत<br>एकंदरीत पंच फितूर झाल्याने व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | नाही. | नाह |
| ५ | सेशन केस क्र. ८१३/२०१३<br>अतिरीक्त सत्र न्यायाधीश<br>**सुरेखा सिन्हा** | **डोंगरी पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र.२०/२०१३, कलम ३७६, ४१७, ४२० भा.दं.वि. | १६/०९/२०१३ | १५/१०/२०२५ | १. पिडीत महिलेने तक्रार दाखल करायला जो विलंब केला त्याचे स्पष्टीकरण दिले नाही.<br>२. तक्रारदार महिलेच्या साक्षीमध्ये विरोधाभास आहे.<br>३. पिडीत महिलेच्या जबाब विश्वासहर्ता नाही.<br>४. सदर आरोपीने तक्रारदार महिले सोबत लैंगिक संबंध प्रस्थापित केले असे दर्शिवणारा कोणताही स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा नाही.<br>५. आरोपीने तक्रारदार महिले सोबत जबरदस्तीने लैंगिक संबंध प्रस्थापित केले संबंधीत तक्रारदार महिलेच्या शरिरावर कोणत्याही अंतर्गत व बाहय दुखापत नाही. त्यामुळे बलात्काराची पृष्ठी होत नाही.<br>६. तक्रारदार महिलेच्या साक्षीमध्ये विरोधाभास तफावत दिसून आली.<br>७. तक्रारदार महिलेने आशाच प्रकारचे तक्रार मनोज कुमार | नाही | ना |

Scanned with CamScanner

| प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नावाच्या व्यक्तीवर केले होती.<br>८. आरोपीने सदर महिलेकडून पैसे घेतले. सदर महिलेने असा कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. पैसे दिलेल्याचा व्यवहाराबद्दल कोणताही कागदोपत्री पुरावा नाही.<br>९. पिडीत महिलेने आरोपीसोबत संबंध प्रस्थापित करताना कधीही प्रतिकार केला नाही.<br>१०. सदर तक्रारदार महिला हॉटेल लॉजमध्ये हॉटेलच्या खोलीत आरोपीसोबत राहिली आरोपीच्या कृत्याला तिची संमती असल्याचे स्पष्ट होते.<br>११. सदर महिलेच्या विधानात आणि सहमतीच्या संबंधात तफावत दिसून येत आहे.<br>१२. सदर घटनेमध्ये तक्रारदार महिलेची एकमेव साक्ष आहे. आरोपीला कथित गुन्हयासाठी दोषी ठरविण्यासाठी पुरेशी नाही. असा मा. न्यायालयाचा निष्कर्ष दिसून येत आहे.<br><br>तपास आरोपी विरुध्द कथित गुन्हा सिध्द करण्यासाठी पुरेसा पुरावा रेकॉर्डवर उपलब्ध नसल्यामुळे आरोपी दोषमुक्त झाला आहे. | | | |

Scanned with CamScanner